## प्रतीक्षा कारडेपोची

बोगदा खोदण्याची कामे पूर्ण झाल्यानंतर ट्रॅक टाकणे, वीज पुरवठ्याच्या लाइन टाकणे, सिग्नल यंत्रणा उभारणे ही महत्त्वाची कामे सुरू होतील. या कामांना अजून वेळ असला तरी प्रकल्पाच्या टप्प्यातील ही महत्त्वाची कामे मानली जातात. मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनला आता आरे कॉलनीतील कारडेपोची प्रतीक्षा आहे. कारडेपोसाठी काही वृक्ष तोडावे लागणार आहे. त्यासाठी मुंबई महापालिकेच्या वृक्ष प्राधिकरणाची आवश्यकता आहे. मात्र वृक्ष प्राधिकरणात तज्ज्ञांपेक्षा नगरसेवकांचीच संख्या जास्त असल्याचा आक्षेप घेत मध्यंतरी काही स्वयंसेवी संस्थांनी न्यायालयात याचिका दाखल केली होती. प्राधिकरणावर तज्ज्ञांची नियुक्ती करण्याचे आदेश न्यायालयाने दिल्यानंतरही या नेमणुका करण्यास पालिकेने बराच वेळ घेतला. आता या नियुक्त्या झाल्याने कारडेपोसाठी वृक्ष तोडण्यास लवकर परवानगी मिळेल, त्यायोगे कारडेपोचे काम लवकरात लवकर सुरू होईल, अशी कॉर्पोरेशनला आशा आहे.



# मेट्रो ३ने घेतला वेग

**वरळी ते धारावी पट्ट्यात सर्वाधिक काम पूर्ण**

कुलाबा वांद्रे सीप्झ या भूमिगत मेट्रो ३ प्रकल्पाची कामे वेगाने सुरू असून वरळी ते धारावी या पट्ट्यात सर्वाधिक काम पूर्ण झाले आहे. बोगदा खोदतानाच आतील भागात सिमेंटचे अस्तर बसवणे, स्लॅब टाकणे ही कामेही एकाच वेळी सुरू आहेत. कुलाबा ते सीप्झदरम्यान सात टप्प्यांत कामे सुरू असून त्यासाठी वेगवेगळे कंत्राटदार नियुक्त करण्यात आले आहेत. प्रत्येक टप्प्यात कामे प्रगतीपथावर आहेत. बोगद्याच्या एकूण लांबीच्या अर्धा अधिक लांबीच्या बोगद्यांची कामे पूर्ण झाली आहेत.

## अशी सुरू आहेत कामे

- स्टेशन बॉक्स पालयिंग २७७२९ पैकी २६४०८ पूर्ण
- स्थानक बॉक्स एन्ट्री एक्झिट १०७४० पैकी ५२८६ पूर्ण
- गाळ माती. ५०५६४७२ क्युबिक मीटर पैकी ३३२७८६७
- बोगद्यातील सिमेंट अस्तरीकरण ३८९९१ पैकी २८९०९ पूर्ण
- ५२.२१ मीटरपैकी २५.४० मीटर बोगदा पूर्ण
- ३२ ठिकाणांपैकी १२ ठिकाणाहून टीबीएम यंत्रे काम पूर्ण करून बाहेर
- स्लॅब १८९९५३ पैकी ५१४८५ पूर्ण

- पॅकेज १ : कफ परेड ते सीएसटी मेट्रो स्थानक. ५८९४ मीटरपैकी २२०७ मीटरचा बोगदा पूर्ण
- पॅकेज २ : सीएसटी मेट्रो स्थानक ते मुंबई सेंट्रल स्थानक. ७६४० पैकी ४५६१ मीटर पूर्ण
- पॅकेज ३ : मुंबई सेंट्रल ते वरळी स्थानक. ७२९० मीटरपैकी ८८१ मीटर पूर्ण
- पॅकेजे ४ : वरळी ते धारावी. १०९६० मीटरपैकी ६२६७ मीटर पूर्ण
- पॅकेज ५ : धारावी ते आग्रीपाडा. ७९९२ मीटरपैकी ४८१८ मीटर पूर्ण





- पॅकेज ६ : आग्रीपाडा ते आंतरराष्ट्रीय विमानतळ. ६९३७ पैकी २१६७ मीटर पूर्ण
- पॅकेज ७ : आंतरराष्ट्रीय विमानतळ ते सारीपूत नगर. ७०७९ मीटरपैकी ३७१५ मीटर पूर्ण.